# ऋणनिर्देश


कोणताही अभ्यास विषय निवडताना आवड ही महत्वाची असते. शेती, शेतकरी आणि त्याचा विकास याबद्दल मला जिव्हाळा आहे. त्या अनुषंगानेच मी शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती साधणाऱ्या संस्थेवर शोध प्रबंध लिहिण्याचा निर्णय घेतला त्यामुळे ''कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर: एक राजकीय व प्रशासकीय अभ्यास'' हा विषय संशोधनासाठी निवडला. या विषयाला माझे मार्गदर्शक डॉ. दादासाहेब रा. शिरगावे सर, यांनी सहमती दर्शविली. त्यांचे सहकार्य, प्रेरणा व मार्गदर्शन यामुळेच हा शोधप्रबंध मी पूर्ण करु शकलो. त्यांच्या ऋणातून उतराई होण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहण्यातच मला आनंद वाटेल.

कोणतेही कार्य मार्गदर्शनाशिवाय पूर्ण होत नाही. शोध प्रबंध लिहीताना राज्य शात्र विभाग प्रमुख डॉ. अशोक चौसाळकर सर, डॉ. के.के. कावळेकर सर, डॉ. लक्ष्मीनारायण तारोडी सर, डॉ. सौ. व्ही.पी. रासम मॅडम, डॉ. मेधा नानीवडेकर मॅडम, प्रा.सौ. भारती पाटील मॅडम या गुरुवर्यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्यांचे मी अंत:करणपूर्वक आभार मानतो.

प्रबंधपूर्तीच्या कामी कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर या संस्थेचे सभापती श्री. बाबगोंडा पाटील साहेब, उपसभापती, सर्व संचालक मंडळ तसेच सचिव श्री. आर.एन. जाधव साहेब, अधिकारीवर्ग व सर्व कर्मचारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली व वेळोवेळी सहकार्य केले. या बद्दल त्यांचे आभार मानतो. बाजार आवारातील शेतकरी, व्यापारी, कामगार यांनी आवश्यक ती माहिती दिली त्याबद्दल सर्वांचा मी ऋणी आहे.

मला शिक्षणासाठी सतत प्रेरणा देणारे माझे आई-वडील व कुटूंबीय यांचे आशिर्वाद हे माझे सामर्थ्य आहे. माझा शोधप्रबंध लिहिताना माहिती मिळविण्यासाठी सतत सहकार्य देणारे सर्व मित्र, राज्यशास्त्र विभागातील श्री. संभाजी तोरस्कर, श्री. अरुण वणिरे यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

या विषयाच्या अनुषंगाने लागणारी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या कार्यात कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, दैनिक सकाळ, दैनिक पुढारी, दैनिक तरुणभारत व शिवाजी विद्यापीठातील बॅ. खर्डेकर ग्रंथालय यांची मोलाची मदत मिळाली. या शोधप्रबंधाचे काम तत्परतेने पूर्ण करून देणारे श्रीकांत कॉम्प्युटर्स, कोल्हापूर तसेच या कामी ज्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य, प्रोत्साहन लाभले त्या सर्वांचे आभार मानतो.

धन्यवाद !

*शहाजीराव धोंडीराम वारके*